# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.08.2024** **वार– शनिवार**

---

**दृष्टी बाधित**

दृष्टिबाधितांसाठी ऑडिओ स्वरुपातल्या पुस्तकांचं दालन विनामूल्य उपलब्ध करून देणाऱ्या यशोवाणी या संस्थेच्या कार्यकर्त्यांची कार्यशाळा आज पुण्यात पार पडली. प्राची गुर्जर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या यशोवाणीनं आतापर्यंत सुमारे पाच हजार पुस्तकं ऑडिओ स्वरूपात तयार केली असून त्यामध्ये शाळा महाविद्यालयीन, कायदेविषयक, स्पर्धा परीक्षांची पुस्तकं, वृत्तपत्रांमधील लेख, अग्रलेख यांचा समावेश आहे. सुमारे पाचशे कार्यकर्ते यासाठी विनामूल्य सेवा देत असून देशभरातल्या 30 हजारांहून अधिक दृष्टिबाधितांना याचा लाभ मिळाला आहे. आज झालेल्या कार्य शाळेत दृष्टिबाधितांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांना समाजात सन्मानाने पुढे जाण्यासाठी करायच्या प्रयत्नांविषयी चर्चा करण्यात आली. आम्हाला वेगळं समजू नका अशीच भावना यावेळी उपस्थित दृष्टिबाधितांनी व्यक्त केली. नेत्र दान करण्याची शपथ यावेळी कार्यकर्त्यांनी घेतली.

**ध्वनी प्रदूषण**

सार्वजनिक गणेशोत्सव अथवा अन्य उत्सवांच्या वेळी शहराच्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होतं मात्र शासनाच्या संबंधित खात्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे याप्रकरणी पुढील कारवाई होताना दिसत नसल्याचा आरोप विविध स्वयंसेवी संस्थांकडून करण्यात आला आहे. ध्वनी प्रदूषणाबद्दल फौजदारी कारवाई करण्याचा अधिकार राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला आहे परंतु शहरातील कोणत्याही जाहीर कार्यक्रमात ध्वनी प्रदूषण झालं असल्याबद्दलच पोलिसांचा अधिकृत अहवाल आमच्याकडे सादर झाल्याखेरीज आम्ही संबंधितांवर फौजदारी कारवाई करू शकत नाही असं स्पष्टीकरण मंडळाकडून देण्यात आलं आहे. ढोल ताशा पथकांच्या सरावाला स्थानिक पोलीस परवानगी देत असून आवाज मर्यादेचा भंग झाल्यास त्यावरील कारवाईचे अधिकार प्रदूषण नियंत्रण मंडळाला आहेत असं महापालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं मतदान जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. मयत अथवा स्थलांतरित मतदाराचं नाव वगळणं, नावामध्ये किंवा पत्त्यात दुरुस्ती आदी कार्यवाही करण्यात येत आहेत, नागरिकांना ऑनलाईन पद्धतीनं voters.eci.gov.in अथवा voter helpline app किंवा नजीकच्या मतदान केंद्रावर नाव नोंदणी करता येणार आहे.

**विधि संघर्षित**

विधींकरिता बालकांना गुन्हेगारीपासून परावृत्त करून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेल्या वर्षापासून पुणे शहर पोलिसांनी परिवर्तन उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. याअंतर्गत आतापर्यंत, शोभेच्या वस्तू तसंच इतर काही वस्तू तयार करण्याचं प्रशिक्षण दीडशे बालकांना देण्यात आलं आहे. तसंच या प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळावा यासाठी पोलीस विभाग प्रयत्न करत असल्याची माहिती सह-पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**कापूस**

पुणे जिल्हयात खरीप हंगामात भात, सोयाबीन, बाजरी, मूग आणि भूईमुग पिकाचं क्षेत्र अधिक आहे. तर जिल्हयात यापूर्वी कापूस लागवडीचं सरासरी 50 हेक्टर क्षेत्र होतं मात्र ते आता दोन हजार 195 हेक्टरपर्यंत वाढलं असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. दौंड, शिरूर आणि बारामती तालुक्यात ही लागवड वाढली आहे.

**सुळे**

बांधकाम क्षेत्रातील वाढत्या किंमतींमुळे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना दिली जाणारी रक्कम अपुरी पडत असून त्यामध्ये वाढ करावी. याबरोबरच महाराष्ट्र शासनाच्या मोदी आवास योजनेसाठी राज्याकडे पुरेसा निधी नसल्यानं अनेक पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळत नसल्यानं ही संपूर्ण योजना केंद्र सरकारनं आपल्या ताब्यात घ्यावी, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांना याबाबत सविस्तर पत्र देऊन खासदार सुळे यांनी ही मागणी केली आहे. योजनेअंतर्गत ग्रामीण भागात मिळणारी रक्कम किमान  तीन लाख रुपयांपर्यंत वाढविण्याबाबत लाभार्थ्यां कडून मागणी होत असल्याचं सुळे यांनी नमूद केलं आहे.

**दरड**

पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी, खेड, आंबेगाव आणि जुन्नर  तालुक्यातील काही दरड प्रवण ठिकाणाची पाहणी भारतीय भू वैज्ञानिक सर्वेक्षण विभागाकडून केली जाणार आहे. प्रामुख्याने मावळ आणि मुळशी तालुक्यातील अनेक डोंगरावर आणि डोंगर उतारावर बंगले आणि गृहनिर्माण प्रकल्प होत असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनीचं सपाटी करण सुरु आहे.

**अत्रे-महोत्सव-पीआर**
सव्यसाची पत्रकार, लेखक, चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त पुण्यातील अत्रे संस्था आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या वतीनं उद्यापासून तीन दिवसांच्या चित्रपट महोत्सवाच आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये आचार्य अत्रे निर्मित आणि दिग्दर्शित श्यामाची आई, महात्मा फुले आणि ब्रॅन्डी की बोटल हे चित्रपट सकाळी 11 आणि संध्याकाळी साडेसहा वाजता पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या प्रेक्षा गृहात दाखवण्यात येतील.

पुणे आणि परिसरात पावसाच्या मध्यम सरी पडत आहेत. उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**